अत्यंत महत्वाचे

शिक्षण विभाग
१३८३३
दिनांक २३/४/१५
नागपूर

# महाराष्ट्र शासन
## सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग
## कार्यालय - जिल्हा समाज कल्याण अधिकारी, जिल्हा परीषद, नागपूर

जिल्हा परीषद, नवीन प्रशासकीय इमारत, तळमाळा, रविभवन समोर,
ईस्ट हायकोर्ट रोड, सिव्हील लाइन, नागपूर

Email:swozpngp@gmail.com Fax & ph.No.- 0712-2564324

क्र. जिपना /जिसकअ/शिक्षण/२०१५-१६/ ३० नागपूर दि.२३/०४/२०१५

## परिपत्रक

प्रति,

१) शिक्षणाधिकारी (माध्य./प्राथ.), जि.प.नागपूर.
२) शिक्षणाधिकारी, महानगरपालीका, नागपूर.
३) खंड विकास अधिकारी, पंचायत समिती....................(सर्व)
४) गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती.......................(सर्व)
५) मुख्याधिकारी, नगर परीषद .................................(सर्व)
६) मुख्याध्यापक..................................................(सर्व)

**विषय :- विविध शैक्षणिक योजनांचे शिष्यवृत्ती प्रस्ताव सादर करणेबाबत.**

समाज कल्याण विभाग, जिल्हा परीषद, नागपूर व्दारा मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी विविध शैक्षणिक सवलतीच्या व शिष्यवृत्ती योजना राबविण्यात येतात. हया योजना राबवितांना येणाऱ्या अडचणींवर मात करण्याचे दृष्टीने सदर योजनांचे प्रस्ताव दरवर्षी सोबतच्या माहिती पत्रकात नमुद सूचना व अटी नुसार सादर करावेत व त्याप्रमाणे कार्यवाही करावी. तसेच **सदर परीपत्रकाच्या प्रती पंचायत समिती स्तरावरून त्यांच्या अधिनस्त असलेल्या सर्व शाळांना वितरीत करण्यात याव्या.** विविध प्रस्ताव सादर करण्याची अंतीम मुदत खालील प्रमाणे आहे.

| अ. क्र. | योजना | प्रस्ताव सादर करण्याचा कालावधी |
|---|---|---|
| १ | इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींसाठी असलेली सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. | https://mahaeschol.maharashtra.in या संकेतस्थळावर दिलेल्या कालावधी नुसार शाळांनी त्यांच्या Udise number वरून पात्र विद्यार्थिनींचे online अर्ज भरून १० दिवसाचे आत हार्ड- कॉपी आवश्यक कागदपत्रांसह समाज कल्याण कार्यालय, जि.प., नागपूर येथे सादर करावी. |
| २ | इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील मुलींसाठी असलेली सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना. | https://mahaeschol.maharashtra.in या संकेतस्थळावर दिलेल्या कालावधी नुसार शाळांनी शाळांनी त्यांच्या Udise number वरून पात्र विद्यार्थिनींचे online अर्ज भरून १० दिवसाचे आत हार्ड- कॉपी आवश्यक कागदपत्रांसह समाज कल्याण कार्यालय, जि.प., नागपूर येथे सादर करावी. |

| | | |
|---|---|---|
| ३ | इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना. | https://mahaeschol.maharashtra.in या संकेतस्थळावर दिलेल्या कालावधी नुसार शाळांनी शाळांनी त्यांच्या Udise number वरून पात्र विद्यार्थ्यांचे online अर्ज भरून १० दिवसाचे आत हार्ड- कॉपी आवश्यक कागदपत्रांसह समाज कल्याण कार्यालय, जि.प., नागपूर येथे सादर करावी. |
| ४ | अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती योजना. | https://mahaeschol.maharashtra.in या संकेतस्थळावर दिलेल्या कालावधी नुसार शाळांनी शाळांनी त्यांच्या Udise number वरून पात्र विद्यार्थिनींचे online अर्ज भरून १० दिवसाचे आत हार्ड- कॉपी आवश्यक कागदपत्रांसह समाज कल्याण कार्यालय, जि.प., नागपूर येथे सादर करावी. |
| ५ | इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना. | ०१ जुलै ते ३० सप्टेंबर पर्यंत |
| ६ | इयत्ता १० वी च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क परत करण्याची योजना | ०१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर पर्यंत |
| ७ | शिक्षण शुल्क, सत्र शुल्क इत्यादींची प्रतिपूर्ती करण्याची योजना. | ०१ ऑक्टोबर ते ३१ डिसेंबर पर्यंत |
| ८ | शालांतपूर्व शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना | ०१ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर पर्यंत |
| ९ | शालांत परीक्षोत्तर शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना | ०१ ऑगस्ट ते ३१ डिसेंबर पर्यंत |

वरील सर्व योजनांचे अर्ज भरण्याची जबाबदारी संबंधित शाळेचे मुख्याध्यापक यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे. तेव्हा शाळेच्या मुख्याध्यापकांनी उपरोक्त कालावधीत परीपूर्ण प्रस्ताव सर्व आवश्यक कागदपत्रांसह समाज कल्याण कार्यालय, जिल्हा परीषद, नागपूर येथे योजना निहाय व प्रवर्ग निहाय सादर करावेत. विहित कालावधीत अर्ज सादर न झाल्यास त्याची संपूर्ण जबाबदारी संबंधित मुख्याध्यापकांची राहील, याची नोंद घ्यावी.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परीषद, नागपूर.

प्रतिलिपी :-

१. मा. आयुक्त, समाज कल्याण, महाराष्ट्र राज्य पुणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
२. मा. प्रादेशिक उपायुक्त, समाज कल्याण विभाग, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. मा. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परीषद, नागपूर यांना माहितीस्तव सविनय सादर.

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परीषद, नागपूर.

# मागासवर्गीय व अपंग विद्यार्थ्यांसाठी समाज कल्याण विभागाच्या योजनांची संक्षिप्त माहिती

१) **इयत्ता ८ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींसाठी असलेली सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना :-** वर्ग ८ ते १० मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय मुलींचे शाळेतील गळतीचे प्रमाण कमी व्हावे याकरिता सन २००३-०४ या वर्षापासून सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना सुरू करण्यात आली. अनुसूचित जातीच्या मुलींचे प्रस्ताव समाज कल्याण विभाग, जिल्हा परीषद, नागपूर व्दारा मंजूर होतात. तर वि.जा.भ.ज./वि.मा.प्र. मुलींचे प्रस्ताव सहाय्यक आयुक्त, समाज कल्याण, नागपूर यांचे व्दारा मंजूर होतात. सदर योजना सन २०१३-१४ पासून online करण्यात आली असून तेव्हापासून थेट विद्यार्थ्यांच्या खात्यांवर ECS प्रणालीव्दारे ही शिष्यवृत्ती जमा करण्यात येते.

**शासन निर्णयः-** सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी-२००३/प्र.क्र.११६/मावक-२/मंत्रालय मुंबई दि.२३ मार्च २००३

**शिष्यवृत्तीचे दर :-** वर्ग ८ ते १० करिता रू. १००/- प्रतिमाह (१० महिन्यांसाठी ) एकूण रू.१०००/-

**अटी :-** १. वर्ग ८ वी ते ९ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या मुलींकरिता ही योजना लागू आहे.

२. पालकांच्या उत्पन्नाची अट नाही.

३. शाळेमार्फत ऑनलाईन अर्ज भरले असणे आवश्यक आहे.

४. मुलींचे स्वत:चे नावे बँकेत खाते क्रमांक असणे आवश्यक आहे.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-** (सर्व कागदपत्रे मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली असावीत.)

१. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर PDF मध्ये काढलेली हार्डकॉपी.

२. शाळेची मान्यतेची सत्यप्रत

३. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील प्रमाणपत्र. (परीशिष्ट अ प्रमाणे)

२) **इयत्ता ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, विमुक्त जाती व भटक्या जमाती आणि विशेष मागास प्रवर्गातील मुलींसाठी असलेली सावित्रीबाई फुले शिष्यवृत्ती योजना :-** या योजनेअंतर्गत वर्ग ५ वी ते ७ वी मधील अनुसूचित जाती, वि.जा.भ.ज. व विशेष मागास प्रवर्गातील विद्यार्थिनींना शिक्षणासाठी प्रोत्साहनपर शिष्यवृत्ती दिली जाते. सदर योजना सन २०१३-१४ पासून online करण्यात आली असून तेव्हापासून थेट विद्यार्थ्यांच्या खात्यांवर ECS प्रणालीव्दारे ही शिष्यवृत्ती जमा करण्यात येते.

**शासन निर्णयः-**

१. समाज कल्याण सांस्कृतिक कार्य व क्रीडा विभाग शासन निर्णय क्र. इबीसी - १०९४/ ३२०३८/ प्र.क्र.१० मावक-२ दि. १२/०१/१९९७

२. सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी-२००३/प्र.क्र.४१७/मावक-२/मंत्रालय मुंबई दि.३१ मार्च २००५

**शिष्यवृत्तीचे दर :-** वर्ग ५ ते ७ करिता रू. ६०/- प्रतिमाह (१० महिन्यांसाठी ) एकूण रू. ६००/-

**अटी :-** १. वर्ग ५ वी ते ७ वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती, वि.जा.भ.ज. व विशेष मागास प्रवर्गातील मुलींकरिता ही योजना लागू आहे.

२. पालकांच्या उत्पन्नाची अट नाही.

३. शाळेमार्फत ऑनलाईन अर्ज भरले असणे आवश्यक आहे.

४. मुलींचे स्वतःचे नावे बँकेत खाते क्रमांक असणे आवश्यक आहे.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-** (सर्व कागदपत्रे मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली असावीत.)

१. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर PDF मध्ये काढलेली हार्डकॉपी.
२. शाळेची मान्यतेची सत्यप्रत
३. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील प्रमाणपत्र. (परीशिष्ट अ प्रमाणे)

३) **इयत्ता ९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांसाठी भारत सरकार मॅट्रिकपूर्व शिष्यवृत्ती योजना :-** इयत्ता ९ वी आणि १० वी मध्ये शिकत असलेल्या अनुसूचित जातीच्या मुला-मुलींसाठी ही योजना केंद्र शासनामार्फत सुरू करण्यात आली आहे. यासाठी पालकांच्या वार्षिक उत्पन्नाची मर्यादा रू. २.०० लाख इतकी आहे. योजनेचा लाभ अनुसूचित जातीच्या विद्यार्थ्यांना त्वरित मिळण्याच्या दृष्टीने जे पालक नोकरित आहेत त्यांनी फॉर्म नंबर १६ व जे पालक नोकरीत नाहीत त्यांनी कोऱ्या कागदावर वार्षिक उत्पन्नाबाबतचे हमीपत्र देणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्तीचे दर :-**

| वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी | वसतीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|
| रू. ३५० x १० महिने = रू ३५००/-<br>अधिक तदर्थ अनुदान = रू. १०००/- | रू. १५० x १० महिने = रू १५००/-<br>अधिक तदर्थ अनुदान = रू. ७५०/- |

**अटी :-** १. वर्ग ९ वी व १० वी मध्ये शिकणाऱ्या अनुसूचित जाती च्या मुला- मुलींकरिता ही योजना लागू आहे.

२. पालकांचे वार्षिक उत्पन्न रू. २.०० लाखापेक्षा कमी असावे.

३. शाळेमार्फत ऑनलाईन अर्ज भरले असणे आवश्यक आहे.

४. मुलींचे स्वतःचे नावे बँकेत खाते क्रमांक असणे आवश्यक आहे.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-** (सर्व कागदपत्रे मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली असावीत.)

१. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर PDF मध्ये काढलेली हार्डकॉपी.
२. विद्यार्थ्यांचे अनुसूचित जातीचे प्रमाणपत्र.
३. पालकांचे उत्पन्नाचे प्रमाणपत्र.
४. शाळेची मान्यतेची सत्यप्रत
५. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील प्रमाणपत्र.(परीशिष्ट अ प्रमाणे)
६. वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची मुख्याध्यापकांच्या सही व शिक्यासह प्रमाणित यादी.

**४) अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांच्या पाल्यांना दिली जाणारी शिष्यवृत्ती योजना :-** जे लोक अस्वच्छ व्यवसायात काम करतात त्या पालकांच्या मुलांना ही शिष्यवृत्ती दिली जाते. या योजनेत कागद, काच, पत्रा गोळा करणाऱ्या पालकांच्या मुलांचाही समावेश करण्यात आला आहे. सदर योजनेसाठी धर्माची /जातीची तसेच उत्पन्नाची कोणतीही अट नाही. तथापि अस्वच्छ व्यवसाय करणाऱ्या पालकांकडून याबाबत रू. २० च्या स्टँप पेपरवर हमीपत्र घेण्यात येते. सदर योजनेचे ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक आहे.

**शिष्यवृत्तीचे दर :-**

| वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी | वसतीगृहात न राहणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी |
|---|---|
| रू. ७०० x १० महिने = रू ७०००/-<br>अधिक तदर्थ अनुदान = रू. १०००/- | रू. ११० x १० महिने = रू ११००/-<br>अधिक तदर्थ अनुदान = रू. ७५०/- |

**अटी :-** १. वर्ग १ ते १० मध्ये शिकणाऱ्या मुला- मुलींकरिता ही योजना लागू आहे.
२. पालक अस्वच्छ व्यवसायात काम करणारे असावे.
३. शाळेमार्फत ऑनलाईन अर्ज भरले असणे आवश्यक आहे.
४. मुलींचे स्वतःचे नावे बँकेत खाते क्रमांक असणे आवश्यक आहे.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-** (सर्व कागदपत्रे मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली असावीत.)

१. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर PDF मध्ये काढलेली हार्डकॉपी.
२. पालक अस्वच्छ व्यवसाय करित असल्याबाबत सक्षम प्राधिकाऱ्याचे प्रमाणपत्र.
३. पालकांचे रू. २० च्या स्टँप पेपरवरील प्रतिज्ञापन.
४. शाळेची मान्यतेची सत्यप्रत
५. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील प्रमाणपत्र. (परीशिष्ट अ प्रमाणे)
६. वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची मुख्याध्यापकांच्या सही व शिक्यासह प्रमाणित यादी.

**५) इयत्ता ५ वी ते १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी असणारी गुणवत्ता शिष्यवृत्ती योजना :-** वर्ग ५ ते १० मध्ये शिकणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये शैक्षणिक गुणवत्ता निर्माण व्हावी म्हणून प्रत्येक वर्गातून (तुकडीतून नाही) प्रथम व व्दितीय क्रमांक आलेल्या दोन मागासवर्गीय विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देण्यात येते.

**शासन निर्णय:-** सामाजिक न्याय, सांस्कृतिक कार्य, क्रिडा व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. इबीसी-१०९४/प्र.क्र.१०९/मावक-२/मंत्रालय मुंबई दि.१७ ऑगस्ट १९९५

**शिष्यवृत्तीचे दर :-**

| वर्ग | ५ वा पास | ६ वा पास | ७ वा पास | ८ वा पास | ९ वा पास |
|---|---|---|---|---|---|
| दर (वार्षिक) अनु. जातीसाठी | ५००/- | ५००/- | ५००/- | १०००/- | १०००/- |
| दर (वार्षिक) वि.जा.भ.ज, वि.मा.प्र. व अनु. जमाती साठी | २००/- | २००/- | २००/- | ४००/- | ४००/- |

**अटी :-** १. सदर शिष्यवृत्ती जून ते मार्च या १० महिन्यांसाठी देय राहील.
२. विद्यार्थ्यांना वार्षिक परीक्षेमध्ये किमान ५० टक्के गुण असणे आवश्यक आहे.
४. एका वर्गातील २ विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ती देय राहील.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-** (सर्व कागदपत्रे मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली असावीत.)

१. शाळेमार्फत विद्यार्थिनींची यादी.
२. उपशिक्षणधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र प्रपत्र- ई.
३. विद्यार्थ्यांचे खाते क्रमांक (IFSC कोड सह).
४. शाळेची मान्यतेची सत्यप्रत
५. बी.टी.आर.३९ मुख्याध्यापकांचे स्वाक्षरीसह. रक्कम रु. ५०००/- चे वर असल्यास रू. १/- ची राजस्व तिकीट लावणे आवश्यक आहे.
६. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील माहितीपत्र. (परीशिष्ट ब प्रमाणे)

६) **इयत्ता १० वी च्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी परीक्षा शुल्क परत करण्याची योजना :-** वर्ग १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना परीक्षा शुल्क व प्रात्यक्षिक शुल्क **महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने प्रमाणित केलेल्या दरानुसार** परत करण्यात येते.

**दर :-** प्रतिविद्यार्थी परीक्षा शुल्क व प्रात्यक्षिक शुल्क एकूण रू. ३१०/-

**अटी :-** १. वर्ग १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता ही योजना लागू आहे.
२. पालकांच्या उत्पन्नाची अट नाही.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-**

१. शाळेमार्फत विद्यार्थिनींची यादी.
२. उपशिक्षणधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र प्रपत्र- ई.
३. शाळेच्या मुख्याध्यापकांचे खाते क्रमांक व नमुना स्वाक्षरी प्रत.
४. शाळेची मान्यतेची सत्यप्रत
५. बी.टी.आर.३९ मुख्याध्यापकांचे स्वाक्षरीसह. रक्कम रु. ५०००/- चे वर असल्यास रू. १/- ची राजस्व तिकीट लावणे आवश्यक आहे.
६. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील माहितीपत्र. (परीशिष्ट ब प्रमाणे)

७) **शिक्षण शुल्क, सत्र शुल्क इत्यादींची प्रतिपूर्ती करण्याची योजना:-** वर्ग १ ते १० मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांना निशुल्क शिक्षण योजनेअंतर्गत मोफत शिक्षणाची सवलत शासन निर्णयान्वये शासनमान्य प्रमाणित दराने शिक्षण शुल्क व सत्र शुल्क परत करण्यात येते.

**शासन निर्णय:-** महाराष्ट्र शासन शालेय शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र. इफइडी-१०५८/प्र.क्र.१९७८/९६शासन-५/मंत्रालय मुंबई दि.१३ जून १९९६

**दर :-** शिक्षण शुल्क, सत्र शुल्क व प्रवेश शुल्क

| वर्ग | | ५ वा | ६ वा | ७ वा | ८ वा | ९ वा | १० वा |
|---|---|---|---|---|---|---|---|
| शिक्षण शुल्क | शहर | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | ग्रामिण | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |
| सत्र शुल्क | शहर | ४ | ४ | ४ | ७ | ७ | ७ |
| | ग्रामिण | ३ | ३ | ३ | ६ | ६ | ६ |
| प्रवेश शुल्क | शहर | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ |
| | ग्रामिण | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ |

**अटी :-** १. वर्ग १० वी मध्ये शिकणाऱ्या मागासवर्गीय विद्यार्थ्यांकरिता ही योजना लागू आहे.

२. पालकांच्या उत्पन्नाची अट नाही.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-** (सर्व कागदपत्रे मुख्याध्यापकांनी साक्षांकित केलेली असावीत.)

१. शाळेमार्फत विद्यार्थिनींची यादी.

२. उपशिक्षणधिकारी / गटशिक्षणाधिकारी यांचे प्रमाणपत्र प्रपत्र- ई.

३. शाळेच्या मुख्याध्यापकांचे खाते क्रमांक व नमुना स्वाक्षरी प्रत.

४. शाळेची मान्यतेची सत्यप्रत

५. बी.टी.आर.३९ मुख्याध्यापकांचे स्वाक्षरीसह. रक्कम रु. ५०००/- चे वर असल्यास रू. १/- ची राजस्व तिकीट लावणे आवश्यक आहे.

६. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील माहितीपत्र. (परीशिष्ट ब प्रमाणे)

८) **शालांतपूर्व शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना :-** वर्ग १ ते १० पर्यंत शिक्षण घेणाऱ्या अंध, अंशतः अंध, अस्थिव्यंग, मुकबधिर, मतीमंद, मासिक आजार, कुष्ठरोगमुक्त अपंग कर्णबधिर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी सदरहू शिष्यवृत्ती दिली जाते.

**शासन निर्णयः-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अपंग-२०१३/प्र.क्र.९१/अ.क.-२ /मंत्रालय विस्तार भवन मुंबई दि. ३०/०८/२०१४

**शिष्यवृत्तीचे दर :-**

| अ. क्र. | अपंगत्वाचा प्रकार | वर्ग | शिष्यवृत्तीचे दर (दरमहा) |
|---|---|---|---|
| १ | अंध, अंशतः अंध, अस्थिविकलांग, कुष्ठरोगमुक्त | १ ली ते ४ थी | १००/- |
| २ | कर्णबधीर | पायरी वर्ग ते ४ थी | १००/- |
| ३ | मतीमंद व मानसिक आजार | नोंदणी प्रमाणपत्र प्राप्त मतिमंदांच्या विशेष शाळातील १८ वर्षापर्यंतचे विद्यार्थी | १५०/- |
| ४ | अंध, अंशतः अंध, अस्थिविकलांग, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधीर | ५ वी ते ७ वी | १५०/- |
| ५ | अंध, अंशतः अंध, अस्थिविकलांग, कुष्ठरोगमुक्त, कर्णबधीर | ८ वी ते १० वी | २००/- |
| ६ | अपंगांच्या कार्यशाळेतील प्रशिक्षणार्थी | ......... | ३००/- |

**अटी :-** १. वर्ग १ ते १० मध्ये शिक्षण घेणारा असावा.

२. अनुदानित वसतीगृहात अथवा अनुदानित निवासी विद्यार्थी नसावा.

३. उत्पन्नाची मर्यादा राहणार नाही.

४. एकाच वर्गात एकापेक्षा जास्त वेळा अनुत्तीर्ण झाला नसावा.

५. अर्जदार गुणवत्ता शिष्यवृत्ती घेतलेला नसावा.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-** (सर्व कागदपत्रे साक्षांकित केलेली असावीत)

१. विहीत नमुन्यातील अर्ज.

२. अपंगांसाठी स्थापन करण्यात आलेल्या वैद्यकीय मंडळाचे अपंग असल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत.

३. गुणपत्रिका व संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र.

४. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील माहितीपत्र. (परीशिष्ट ब प्रमाणे)

**९) शालांत परीक्षोत्तर (मॅट्रिकोत्तर) शिक्षण घेणाऱ्या अपंग विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना :-**

अपंग व्यक्तींना स्वावलंबी बनवून समाजाचा कृतिशील घटक म्हणून जीवन जगता यावे या करिता अपंग व्यक्तीमध्ये शैक्षणिक, व्यावसायीक व तांत्रिक पात्रता निर्माण होण्यासाठी अपंग विद्यार्थ्यांना शालेय महाविद्यालयीन व तांत्रिक व्यावसायिक शिक्षणासाठी शिष्यवृत्ती देण्यात येते. सदर शिष्यवृत्ती अंध, अंशतः अंध, अस्थिव्यंग, मुकबधिर, मतीमंद, मानसिक आजार, कुष्ठरोगमुक्त अपंग व कर्णबधीर विद्यार्थ्यांना शिक्षणासाठी आहे.

**शासन निर्णयः-** सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, शासन निर्णय क्र. अपंग-२०१३/प्र.क्र.९१/अ.क.-२ /मंत्रालय विस्तार भवन मुंबई दि. ३०/०८/२०१४

**शिष्यवृत्तीचे दर :-**

| अ.क्र. | अभ्यासक्रम | निर्वाह भत्याची रक्कम दरमहा रूपये | | वाचक भत्ता दरमहा(अंधांसाठी) |
|---|---|---|---|---|
| | | वसतीगृहवासी | अनिवासी | |
| १ | ११ वी, १२ वी, पदवी, पदविका, पदव्युत्तर अभ्यासक्रमाकरिता | रू. ३८० ते ५७० | रू. २३० ते ३०० | रु. ५० ते १०० |

**अटी :-** १. अंध, अंशतः अंध, अस्थिव्यंग, मुकबधिर, मतीमंद, मानसिक आजार, कुष्ठरोगमुक्त अपंग विद्यार्थी महाराष्ट्र राज्याचा रहिवाशी असावा.

२. अर्जदार मान्यताप्राप्त संस्थेमध्ये अथवा विद्यापिठामध्ये माध्यमिक शिक्षणानंतर चे शिक्षण घेत असलेला असावा.

३. उत्पन्नाची मर्यादा राहणार नाही.

४. एकाच वर्गात एकापेक्षा जास्त वेळा अनुत्तीर्ण झाला नसावा.

५. अर्जदार गुणवत्ता शिष्यवृत्ती खेरीज इतर कोणतीही शिष्यवृत्ती घेत नसावा. घेतलेला नसावा.

**प्रस्तावासोबत जोडावयाची आवश्यक कागदपत्रे :-** (सर्व कागदपत्रे साक्षांकित केलेली असावीत)

१. विहीत नमुन्यातील अर्ज.

२. अपंगांसाठी स्थापन करण्यात आलेल्या वैद्यकीय मंडळाचे अपंग असल्याचे प्रमाणपत्राची सत्यप्रत.

३. गुणपत्रिका व संस्था प्रमुखाचे प्रमाणपत्र.

४. शाळेच्या मुख्याध्यापकांचे विहीत नमून्यातील माहितीपत्र. (परीशिष्ट ब प्रमाणे)

जिल्हा समाज कल्याण अधिकारी,
जिल्हा परीषद, नागपूर.

## परीशिष्ट अ

## (Online शिष्यवृत्तीकरिता मुख्याध्यापकांनी द्यावयाच्या प्रमाणपत्राचा नमुना )

शाळेचे नाव व पत्ता :-........................................................................

Udise number :- HM.NAG........................................................

मुख्याध्यापकांचा संपर्क क्रमांक :-.............................................................

संबंधित लिपीकाचा संपर्क क्रमांक :-........................................................

योजनेचे नाव :-.....................................................................................

शैक्षणिक सत्र :- सन.............................................................................

सादर करावयाच्या अर्जांची संख्या :-.........................................................

यापूर्वी सादर केलेल्या अर्जांची संख्या:-....................................................

एकूण अर्जांची संख्या:-..........................................................................

त्यापैकी वसतीगृहात राहणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या :-....................................

(सोबत विद्यार्थ्यांच्या नावासह स्वतंत्र प्रमाणित यादी जोडावी)

प्रमाणित करण्यात येते की, उपरोक्त योजनेच्या online भरलेल्या सर्व अर्जांची व त्यांच्या तपशीलांची व्यक्तिशः खात्री केलेली असून सदरहू अर्ज समाज कल्याण विभागाच्या ID वर sent for approval व्दारे मंजूरीसाठी पाठविण्यात आले आहेत.

तसेच सदर संकेतस्थळावर शाळेची संपूर्ण माहिती भरण्यात आली असून शाळेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांबाबतची माहिती अद्ययावत करण्यात आली आहे.

स्थळ :- ..........................

दिनांक :- ........................ मुख्याध्यापकांची सही व शिक्का

## परीशिष्ट ब

## ( शिष्यवृत्ती RTGS करिता मुख्याध्यापकांनी द्यावयाच्या माहितीचा नमुना )

शाळेचे नाव व पत्ता :-..........................................................................................

मुख्याध्यापकांचे नाव :-........................................................................................

मुख्याध्यापकांचा संपर्क क्रमांक :-.............................................................................

संबंधित लिपीकाचा संपर्क क्रमांक :-.........................................................................

योजनेचे नाव :-....................................................................................................

शैक्षणिक सत्र :- सन................................................................................................

सादर करावयाच्या एकूण अर्जांची संख्या :-..................................................................

शाळेचे शिष्यवृत्ती खाते क्रमांक :-...................................

IFSC कोड :- ...................................

बँकेचे नाव :- ......................................

शाखा :- ....................................

स्थळ :- .........................

दिनांक :- ........................

मुख्याध्यापकांची सही व शिक्का